महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत उपक्रम
CIN:U40109MH2005HGC153645

मनुष्यबळ पुनर्विलोकन कक्ष
म.रा.वि.वि.कं. मर्यादित
प्रकाशगड, ४ था मजला,
स्टेशन रोड, वांद्रे (पुर्व),
मुंबई - ४०० ०५१

ई-मेल :- cgmte@mahadiscom.in
फॅक्स नं :- ०२२ -२६५८०६४२
वेबसाइट :- www.mahadiscom.in

क्र.मासं/मु.म.व्य.(तांआ)/मपुक/ ३२८५७ दिनांक:०२/०९/२०१५

**कार्यालयीन आदेश क्र. मपुक - ३३ /२०१५**

अ) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, सुत्रधारी कंपनीचा मंडळ ठराव क्र ४५३ दि २७/०८/२०१५ नुसार नागपूर ग्रामिण परीमंडळाचे, विभाजन करुन नवीन परीमंडळ कार्यालयातील कर्मचा-यांचा नवीन आकृतीबंध मंजूर करण्यात आलेला आहे.

ब) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी कर्मचारी सेवाविनियम २००५ अनुसूची एक मधील अनुक्रमांक "ए + बी" तसेच "आय" अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार संचालक (वित्त), संचालक (संचलन) व संचालक (प्रकल्प) यांच्याशी विचारविनिमय करुन व्यवस्थापकीय संचालक, महावितरण यांनी खालील बाबीस मंजूरी दिली आहे.

**१. नागपूर शहर परिमंडळाचे नामकरण नागपूर परिमंडळ असे करण्यात येत असून, नागपूर ग्रामीण परिमंडळाचे अस्तित्व संपुष्टात आणून त्याचे विभाजन करण्यात येत आहे.**

**२. नागपूर परिमंडळाचे मुख्यालय नागपूर येथे असेल व त्यात नागपूर(ग्रामीण), नागपूर(शहर) आणि वर्धा या मंडळ कार्यालयाचा समावेश राहील.**

**३. नागपूर ग्रामीण परिमंडळाचे विभाजन करून गोंदिया परिमंडळ व चंद्रपूर परिमंडळ निर्माण करण्यात येत आहे.**

**४. गोंदिया परिमंडळाचे मुख्यालय गोंदिया येथे राहील व त्याअंतर्गत भंडारा मंडळ व गोंदिया मंडळ, या दोन मंडळाचा समावेश राहील.**

**५. चंद्रपूर परिमंडळाचे मुख्यालय चंद्रपूर येथे राहील व त्याअंतर्गत चंद्रपूर मंडळ व गडचिरोली मंडळ या दोन मंडळाचा समावेश राहील.**

**६. सध्याच्या नागपूर ग्रामीण परिमंडळाच्या आस्थापनेवरील पदे चंद्रपूर परिमंडळ कार्यालयाच्या आस्थापनेवर वर्ग करण्यात येत आहेत.**

**७. गोंदिया परिमंडळ कार्यालयासाठी एकूण २५ खातेनिहाय व ०६ बाहयस्त्रोत पदे मंजुर करण्यात येत आहेत. (तक्ता अ प्रमाणे)**

**८. मुख्य महाव्यवस्थापक (वित्त) यांनी नविन परिमंडळासाठी वित्तीय बाबी संदर्भातील विहित आदेश पारीत करावेत.**

**नविन परिमंडळ निर्मितीची व पूनर्रचनेची कार्यवाही :-**

गोंदिया व चंद्रपूर या २ नवीन परीमंडळाच्या संदर्भात तसेच नागपूर परिमंडळाच्या पूनर्रचनेसंदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१. दि. २१ सप्टेंबर २०१५ रोजी नव्याने निर्माण होणा-या परिमंडळासाठी नियुक्त झालेले मुख्य अभियंता यांनी नविन परीमंडळ मुख्यालयी हजर होऊन तेथील अधीक्षक अभियंता यांच्याशी विचारविनिमय करुन परीमंडळ कार्यालयाची निर्मिती प्रक्रिया सूरु करावी .

२. नविन परिमंडळ कार्यालयाची पदस्थापना करुन तेथील कार्यालयीन रचना व कर्मचारी वर्ग नियुक्ती याबाबतचे प्राथमिक कामकाज आवश्यकतेप्रमाणे मुख्यालयाच्या मान्यतेने पूर्ण करावे व दि २ ऑक्टोबर २०१५ रोजी नवीन परीमंडळाचे उदघाटन संबधित पालक मंत्र्यांच्या हस्ते करुन परिमंडळाचे कामकाज तात्काळ सुरु करावे.

सदर आदेश कंपनीच्या इंन्ट्रानेटवर उपलब्ध असून आदेशाची प्रत कोणत्याही कार्यालयास पाठविली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**(सौ. पुष्पा रा. चव्हाण)**
**मुख्य महा व्यवस्थापक (तांआ)**

तक्ता- अ

## गोंदिया परिमंडळ, गोंदिया यांच्या आस्थापनेसाठी नवीन मंजुर पदांचा तक्ता

| अ.क्र. | पदांची नावे | पद संख्या | | एकूण पदे |
|---|---|---|---|---|
| | **परिमंडळ कार्यालय प्रमुख** | **खातेनिहाय** | **बाहयस्त्रोत** | |
| १ | मुख्य अभियंता (वितरण) | १ | ० | १ |
| | लघुलेखक | १ | ० | १ |
| | वाहनचालक | ० | १ | १ |
| | शिपाई | ० | १ | १ |
| २ | **तांत्रिक विभाग (प्रशासन)** | | | |
| | कार्यकारी अभियंता (वितरण) | १ | ० | १ |
| | उपकार्यकारी अभियंता (वितरण) | २ | ० | २ |
| | सहाय्यक अभियंता (वितरण) | २ | ० | २ |
| | शिपाई | १ | ० | १ |
| ३ | **मानव संसाधन विभाग** | | | |
| | सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं) | १ | ० | १ |
| | वरिष्ठ व्यवस्थापक (मासं) | १ | ० | १ |
| | उपव्यवस्थापक (मासं) | १ | ० | १ |
| | उच्चस्तर लिपिक (मासं) | १ | ० | १ |
| | निम्नस्तर लिपिक (मासं) | २ | ० | २ |
| | शिपाई | १ | ० | १ |
| ४ | **वित्त व लेखा विभाग** | | | |
| | वरिष्ठ व्यवस्थापक (विवले) | १ | ० | १ |
| | व्यवस्थापक (विवले) | ० | ० | ० |
| | उपव्यवस्थापक (विवले) | १ | ० | १ |
| | उच्चस्तर लिपिक (लेखा) | १ | ० | १ |
| | निम्नस्तर लिपिक (लेखा) | ० | ० | ० |
| | शिपाई | ० | १ | १ |
| ५ | **जनसंपर्क विभाग** | | | |
| | जनसंपर्क अधिकारी | १ | ० | १ |
| | निम्नस्तर लिपिक (मासं) | १ | ० | १ |
| | शिपाई | ० | १ | १ |
| ६ | **कामगार विभाग** | | | |
| | उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी | १ | ० | १ |
| | मुख्य लिपिक | १ | ० | १ |
| | निम्नस्तर लिपिक (मासं) | ० | १ | १ |
| | शिपाई | ० | १ | १ |
| ७ | **सी जी आर एफ कक्ष** | | | |
| | कार्यकारी अभियंता (वितरण) | १ | ० | १ |
| | लघुलेखक | १ | ० | १ |
| | शिपाई | १ | ० | १ |
| | **एकूण** | **२५** | **०६** | **३१** |

(सौ. पुष्पा रा. चव्हाण)
मुख्य महा व्यवस्थापक (तांआ)